**<u>ठळक बातम्या</u>**

- १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायतसमित्यांच्या निवडणुकीसाठी मतदान शांततेत सुरु
- मुंबईच्या महापौरपदासाठी भाजपाच्या रितू तावडे आणि उपमहापौरपदासाठी शिवसेनेचे संजय घाडी यांचे अर्ज दाखल
- भारत – अमेरिका अंतरिम व्यापार कराराचं सर्व स्तरातून स्वागत
- प्रधानमंत्री दोनदिवसांच्या दौऱ्यासाठी मलेशियात पोहोचले

**आणि**

- गडचिरोली जिल्ह्यात सुरक्षादलांच्या कारवाईत ७ नक्षली ठार

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्याच्या निवडणुकीसाठी मतदान शांततेत सुरु आहे.

**रायगड**मध्ये आज  साडे अकरा पर्यंत साडे 27 टक्के मतदान झाले.

**सिंधुदुर्ग** जिल्हा परिषदेसाठी ४२ ठिकाणी, ८ पंचायत समितीसाठी ८३ ठिकाणी मतदान होत आहे. यात एकूण ३५९ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. कुडाळमध्ये पावशी इथं नारळाच्या करवंट्या, माडाची झावळं आणि बांबूपासून पर्यावरणपूरक सखी मतदान केंद्र तयार करण्यात आलं आहे.

**छत्रपती संभाजीनगर**मध्ये २२ टक्के तर सांगलीत २० टक्के मतदान झालं.

**पुणे** जिल्ह्यात पहिल्या दोन तासांत सरासरी ७ पूर्णांक ७४ टक्के मतदान नोंदवले गेले. भोर तालुक्यात सर्वाधिक ८ पूर्णांक ७९ टक्के, मावळ ८ पूर्णांक ६३ टक्के,  आंबेगाव ८ पूर्णांक ५६ टक्के, बारामतीमध्ये ६ पूर्णांक ५२ टक्के मतदान नोंदवलं गेलं.

**धाराशिव** जिल्हा परिषदेच्या 55  गटांसाठी  आणि आठ तालुक्यातल्या  आठ पंचायत समित्यांसाठी आज 1 हजार 308 मतदान केंद्रावर सकाळी साडेसात वाजता मतदानाला सुरुवात झाली. सकाळी साडेअकरा वाजेपर्यंत २२ टक्के मतदानाची नोंद झाली आहे.

शेकापूर इथं 'आपले धाराशिव, हरित धाराशिव' या संकल्पनेवर आधारित पर्यावरण पूरक, तसंच वृक्ष लागवडीचा आणि वृक्ष संवर्धनाचा संदेश देणारं मतदान केंद्र तयार करण्यात आलं आहे. तर सांजा इथं संपूर्ण महिला कर्मचारी असलेलं 'पिंक मतदान केंद्र' उभारण्यात आलं आहे. तसंच तालुक्यातल्या चार मतदान केंद्रांवर अभिरुप मतदानाच्या वेळी मतदान सुरू होण्यापूर्वी मतदान यंत्रात तांत्रिक दोष आढळल्याने ही यंत्रे तात्काळ बदलण्यात आली.

**सोलापूर**मध्ये 68 जिल्हा परिषद गटासाठी आणि 136 पंचायत समित्यांसाठी सकाळी साडेअकरा वाजेपर्यंत 19 टक्के मतदान झाले.

**<><><><><>**

राज्यात विविध जिल्ह्यात सुरु असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकात मान्यवरांनीही आपला मतदानाचा हक्क बजावला.

उपमुख्यमंत्री **सुनेत्रा पवार** यांनी बारामतीमधल्या काटेवाडी इथं मतदानाचा हक्क बजावला. लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन नागरिकांनी मतदान करावं असं आवाहन त्यांनी केलं.

मंत्री **दत्तात्रय भरणे** यांनी इंदापूर तालुक्यात भरणेवाडी इथं तर मंत्री **बाबासाहेब पाटील** यांनी लातूर जिल्ह्यातल्या शिरूर ताजबंद इथं, मंत्री **नितेश राणे** यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात वरवडे इथं मतदान केलं.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते **रोहित पवार** यांनी बारामती इथं मतदान केलं. आमदार **संभाजी पाटील निलंगेकर** यांनी औराद शहाजनी इथं, आमदार **अभिमन्यू पवार** यांनी कासार शिरशी इथं, आमदार **संजय बनसोडे** यांनी मलकापूर इथं मतदान केलं. आमदार **अमित देशमुख** आणि **धीरज देशमुख** यांनी बाभळगाव इथं मतदानाचा हक्क बजावला.

खासदार **विशाल पाटील** यांनी सांगली जिल्ह्यातल्या पद्माळे गावात तर माजी मंत्री **हर्षवर्धन पाटील** यांनी बावडा इथं मतदानाचा हक्क बजावला.

**<><><><><>**

सहकारातून समृद्धी हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं स्वप्न साकार करण्यसाठी विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्षमतेनं सहकार क्षेत्रात काम करावं असं आवाहन केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केलं. ते आज पुण्यात वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध

संस्थेत कृषी-व्यवसाय व्यवस्थापन पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ३१व्या दीक्षांत समारंभात बोलत होते. देशातल्या सहकार क्षेत्रातल्या विश्वविद्यालयाचा उल्लेख त्यांनी यावेळी केला.

**- - बाईट - - मुरलीधर मोहोळ - -**

विद्यार्थ्यांनी सहकारी संस्थांमध्ये व्यावसायिकता आणि आधुनिक व्यवस्थापन कौशल्यं आणली पाहिजेत असे मोहोळ म्हणाले. सहकार क्षेत्रात पारदर्शकता आणण्यासाठी तसंच कार्यक्षमता वाढवण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब केला पाहिजे असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी भारतीय जनता पार्टीने रितू तावडे यांचं नाव आज जाहीर केलं, तर उपमहापौर पदासाठी शिवसेनेने संजय घाडी यांचं नाव जाहीर केलं आहे. भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी रितू तावडे यांच्या, तर शिवसेना नेते राहुल शेवाळे यांनी संजय घाडी यांच्या उमेदवारीची घोषणा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज सकाळी केली. शिवसेनेचे संजय घाडी १५ महिने उपमहापौर म्हणून काम करतील, शिवसेना आपल्या चार नगरसेवकांना उपमहापौर पदाचा कार्यकाळ विभागून देणार आहे. असं शिवसेना सचिव संजय मोरे यांनी यावेळी दिलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे.

मुंबई महानगरपालिकेत भाजपा आणि शिवसेना महायुतीला अधिक जागा असल्याने या उमेदवारांची निवड निश्चित मानली जात आहे.

**<><><><><>**

भारत-अमेरिका व्यापार कराराला अंतिम स्वरूप दिल्याबद्दल सर्व स्तरातून स्वागत होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री आणि व्यापारी संघटनांनी या कराराचं स्वागत केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या मलेशिया दौऱ्यासाठी आज क्वालालुंपूरमधे पोहोचले. मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांनी त्यांचं स्वागत केलं. या दौऱ्यात भारत आणि मलेशिया त्यांच्या सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीला अधिक दृढ करण्यासह द्विपक्षीय संबंधांचा सर्वंकष आढावा घेतील. प्रधानमंत्री मोदी तिथल्या भारतीय समुदायाशीही

संवाद साधतील. दोन्ही देशांमधील जनतेच्या मजबूत संबंधांचं प्रतीक म्हणून क्वालालंपूरमध्ये 'सेलामत दातांग मोदी जी' हा मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

**<><><><><>**

नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी सरकारनं सुरु केलेल्या अभियानामुळे नक्षलग्रस्त भागातलं भीतीचं वातावरण संपलं असून विकासाची नवी पहाट उजाडली असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे.  छत्तीसगडमधे जगदलपूर इथं बस्तर पंडुम उत्सवाचं उद्घाटन केल्यानंतर त्या बोलत होत्या.

**- -होल्ड बाईट राष्ट्रपती - -**

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात महाराष्ट्र आणि छत्तीसगड सीमेवर सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत सात नक्षली मारले गेले असून या भागात आता केवळ सात नक्षली शिल्लक राहिल्याचं पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी आज वार्ताहरांना सांगितलं. या परिसरात तीन दिवस शोधमोहीम सुरू होती, यावेळी सुरक्षा दलांबरोबर नक्षलींची चकमक झाली, यात नक्षलींच्या कंपनी क्रमांक दहा चा प्रमुख प्रभाकर आणि कंपनी क्रमांक पाच चा कमांडर पागु मोड्याम यांच्यासह सात जण मारले  गेले. या सात जणांवर मिळून दोनशे गुन्हे दाखल होते, तसंच ७१ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

३१ मार्चपर्यंत गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त होईल, असा विश्वास निलोत्पल यांनी व्यक्त केला आहे.  शिल्लक राहिलेल्या नक्षलींपैकी दोन जण गडचिरोलीमधे असून पाच जण छत्तीसगड राज्यात वास्तव्याला  असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

**क्रिकेट टी ट्वेंटी  विश्वचषक** स्पर्धेला आजपासून  सुरुवात झाली. आजच्या पहिल्या सामन्यात कोलंबो इथं पाकिस्तानने नेदरलँडसवर ३ गडी राखून विजय मिळवला.

आजचा दुसरा सामना वेस्ट इंडिज विरुद्ध स्कॉटलँड यांच्यात कोलकाता इथं होत आहे. तिसऱ्या सामन्यात भारत आणि अमेरिका आमनेसामने असतील. हा सामना मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल.

**<><><><><>**

बीसीसीआय अर्थात भारत क्रिकेट नियामक मंडळाने १९ वर्षांखालील भारतीय पुरुष क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघाला साडेसात कोटी रुपयांचं बक्षिस जाहीर केलं  आहे. काल हरारे इथल्या  हरारे स्पोर्ट्स क्लबमध्ये झालेल्या आयसीसी १९ वर्षांखालील पुरुष क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने इंग्लंडचा १०० धावांनी पराभव करून सहाव्यांदा  विश्वचषक विजेतेपद पटकावलं.

<><><><><>

मुंबई - अहमदाबाद मार्गावर तलासरी इथं पालघर पोलिसांनी औषधांच्या ट्रकमधून होणारी दारुची वाहतूक पकडली. तलासरीजवळ औषधं घेऊन जाणारा  ट्रक पोलिसांनी थांबवला. त्यात बंदी असलेल्या दारुचा 9 लाख 28 हजार रुपये किंमतीचा साठा सापडला. पालघर पोलिस उपअधिक्षकांनी आज ही माहिती दिली.

//<><><><><>//